**नवी मुंबई महानगरपालिका**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-**

**दिनांक : 09/01/2020**

नवी मुंबई महानगरपालिकेची **जानेवारी महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 17 जानेवारी 2020 रोजी सकाळी 11.00 वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

1. इतिवृत्त.

2. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

3. वाशी सेक्टर-10ए येथील मिनाताई ठाकरे उदयानात बुकझानिया थीम पार्क विकसित करणे.

4. नवी मुंबई महानगरपालिकेच्या 08 प्रशासकिय विभाग निहाय दैनंदिन रस्ते, गटार सफाई व पावसाळापुर्व गटार साफसफाईची कंत्राटी कामे करणे.

5. तुर्भे क्षेपणभुमी येथे VII सेल MSW (M&H) Rule 2016 प्रमाणे विकसित करणे.

6. घणसोली विभागातील सम्राटनगर येथील नमुंमपा शाळा क्र. 45 च्या इमारतीच्या दुस-या मजल्याचे वाढीव बांधकाम करणे.

7. घणसोली विभागातील रबाळे गाव येथील नमुंमपा शाळा क्र. 47 च्या इमारतीच्या पहिल्या मजल्याचे वाढीव बांधकाम करणे.

8. मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकेमधील निर्देशाप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीचे सदस्य नेमणुकीचे मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे.

9. नवी मुंबई महानगरपालिकेसाठी “CSR” उपक्रमा अंतर्गत जेटींग, रॉडींग व ग्रॅबींग मशीन सुविधा एकत्र असलेले वाहन उपलब्ध करुन घेणे.

**ठरावाच्या सूचना :-**

**10 व 12. श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून:-**

(10) प्रभाग क्र. 108 मधील प्लॉवर बेड तसेच लॉन याकरीता पाण्याची व्यवस्था करणे. (11) प्रभाग क्र. 108 मधील सेक्टर-50 येथील शाळेचे मैदान लवकरात लवकर विकसित करणे.

(12) सेक्टर-48 येथील गणेश मैदानात LED लाईटस लावणे.

**13. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध आस्थापनेवर अंदाजे 9000 ते 10000 अधिकारी/कर्मचारी कार्यरत असुन ठोक मानधनावरील घनकचरा विभाग, पाणीपुरवठा विभाग, समाज विकास विभाग, शिक्षण विभाग, परिवहन उपक्रम, परिमंडळ विभाग तसेच इतर विभागातील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कंत्राटी स्वरुपात कर्मचारी/कामगार कार्यरत आहेत. त्यापैकी बहुतांशी कर्मचारी यांना 10 वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. तत्कालीन ठाणे जिल्हयाचे मा. पालकमंत्री व सध्याचे आमदार मा. श्री. गणेशजी नाईक साहेब यांचे मार्गदर्शनानुसार या कामगारांना समान कामास समान वेतन देण्याचा ऐतिहासिक कामगार हिताचा निर्णय नवी मुंबई महानगरपालिकेने घेतला आणि कामगारांना आर्थिक स्थैर्य लाभल्याने त्यांच्या समाधाना सोबतच नवी मुंबई महानगरपालिकेचा नावलौकिकही मोठया प्रमाणावर झाला. सदरचे कर्मचारी/कामगार कायमस्वरुपी कर्मचा-यांएवढे परंतु कमी वेतनामध्ये आहे त्या परिस्थितीत काम करतात. म्हणुन या कार्यरत कामगारांचे भवितव्य लक्षात घेता त्यांच्याबाबत नैसर्गिक न्यायाची भुमिका नजरेसमोर ठेवुन नवी मुंबई महानगरपालिकेच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता विविध विभागामध्ये कंत्राटी स्वरुपात कार्यरत असणा-या कर्मचारी/कामगार यांना महापालिका सेवेत आहे त्या पदावर कायम करणे.

**14 ते 16. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**

(14) प्रभाग क्र. 01 ईश्वर नगर येथे सिडकोचा गट क्र. 40 या मोकळया भुखंडावर आरोग्य केंद्र, व्यायाम शाळा, बचत गट भवन, वाचनालय इत्यादी करीता बहुउददेशिय इमारत बांधणे.

(15) प्रभाग क्र. 01 ईश्वर नगर येथे संपुर्ण प्रभागात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे. (16) प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील संपुर्ण प्रभागातील अंतर्गत रस्त्याचे व्हाईट टॅपींग कॉक्रीटीकरण करणे.

**17 ते 19. श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**

(17) सेक्टर-11 जुहुगांव येथील स्वामी नारायण मंदीर ते जुहुगांव स्मशानभुमी पर्यत वृक्षपटटा (Tree Belt) विकसित करणे, सदर ठिकाणी उदयान विकसित करुन लहान मुलांसाठी खेळणीघर व जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. (18) जुहुगांव, सेक्टर-11, वाशी, नवी मुंबई येथील गावदेवी मैदानालगत मोडकळीस आलेले खेळणीघर तोडुन तेथे लग्नकार्य व इतर धार्मिकविधी कार्यक्रमासाठी सुसज्ज हॉल बनविणे. (19) जुहुगांव, सेक्टर-11 येथील गावदेवी मैदानात क्रिकेट स्पर्धा व इतर स्पर्धा तसेच कार्यक्रम होत असतात. त्यासाठी मैदानात सुसज्ज व्यासपीठ (स्टेज) बनविणे.

**20 व 21. श्रीम. निलम निवृत्ती जगताप, यांजकडून :-**

(20) प्रभाग क्र. 29 घणसोली -2 येथील म्हात्रे आळीतील आशन म्हात्रे यांच्या घराजवळील परिसरात गटार व पदपथ बांधणे.

(21) प्रभाग क्र. 29 घणसोली -2 येथील तलावपाळी ते जयश्री नगर येथील नाल्याचे कॉक्रीटीकरण (RCC) करुन बंदीस्त करणे व त्याचे वाहनतळ व फेरीवाल्यांसाठी उपयोग हाईल. त्यामुळे तो परिसर स्वच्छ होईल.

**22 . श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**

प्रभाग क्र. 51 मध्ये बंद पाण्याची टाकी डिमोलीश करुन तेथे नागरीकांना उपयोगासाठी प्रयोजन करणे.

**23 ते 25. श्री. घन:शाम मढवी, यांजकडून :-**

(23) प्रभाग क्र. 31, घणसोली येथील समर्थनगर, जीजामाता नगर, गांवदेवी वाडी, आदिशक्ती नगर, कोंबडी चाळ, चिंचआळी आणि म्हशेश्वर नगर येथ्ज्ञील रस्ते, गटर, पदपथ नादुरुस्त झाले असुन सदर काम इंटिग्रेटेड वर्कमध्ये तात्काळ सुरु करणे.

(24) प्रभाग क्र. 31, घणसोली सेक्टर-8 मध्ये स्मशानभुमी असुन सदर स्मशानभुमीचे अदयावत पध्दतीने नुतनीकरण करुन प्रशस्त अशी अत्याधुनिक स्मशानभुमी बनविणे. (25) प्रभाग क्र. 31, घणसोली, सेक्टर-8 मध्ये स्मशानभुमीच्या बाजुला लागुन होल्डींग पॉड आहे. तर त्या होल्डींग पॉडला तलावाचे स्वरुप देऊन त्यांचे सुशोभिकरण करणे.

**26 व 27. श्रीम. सिमा गायकवाड, यांजकडून :-**

(26) प्रभाग क्र. 31, सेक्टर-8 मध्ये राजीव गांधी कॉलेजच्या बाजुला सिडको निर्मित पाण्याची टाकी असुन, घणसोली गावातील पाण्याची समस्या लक्षात घेता सदर ठिकाणी ESR, GSR पाण्याची टाकी बनविणे. (27) घणसोली गावात ग्रामपंचायत कालीन मच्छीमार्केट असुन सदर मार्केटचे अदयावत असे मच्छी मार्केट बनविणे.

| 28. श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :- | 29 व 30. श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :- |
|---|---|
| स्वच्छ भारत अभियान भारतात जोमाने सुरु असुन प्रत्येक महापालिकेची यासाठी जोमाने स्पर्धा सुरु आहे. ही बाब सर्वश्रुत आहे. भारतात पहिला गारबेज कॅफे छत्तीसगढ येथील भरतपुर येथे सुरु झाला असुन ही संकल्पना अतिशय स्त्युत आणि प्रशंसनिय आहे. यामध्ये कोणत्याही व्यक्तीने संबंधित गारबेज कॅफेवर एक किलो कचरा जमा करुन दिल्यास त्या व्यक्तीला एकवेळचे पोटभर जेवण दिले जाते. तसेच अर्धा किलो कचरा जमा करुन दिल्यास त्या माध्यमातुन त्या व्यक्तीला एकवेळचा पोटभर नाष्टा दिला जातो. याव्दारे महानगरपालिका प्रशासनास अशी विनंती आहे की, अशा प्रकारचा गारबेज कॅफे सुरु करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने उदयुक्त करावे, जेणेकरुन महानगरपालिकेस स्वच्छ भारत अभियानांतर्गत मानांकन उंचावुन उंच शिखर गाठता येईल. | (29) प्रभाग क्र. 43, कोपरखैरणे मध्ये जागेची उपलब्धता असेल अशा ठिकाणी वयोवृध्द लोकांना बसण्यासाठी बेंचेस टाकणे.<br>(30) प्रभाग क्र. 43, कोपरखैरणे मधील पथदिव्यांचे नादुरुस्त खांब बदलणे. |

मा. महापौरांच्या आदेशावरून,

सही/-

(चित्रा बाविस्कर)
महानगरपालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका.

महापालिका सचिव कार्यालय,
नवी मुंबई महानगरपालिका,
दिनांक 09 जानेवारी 2020.